(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# दबाव गट : शेतकरी संघटना

**डॉ. तुकाराम एम. पाटील,** राज्यशास्त्र विभाग, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड

---

**प्रस्तावना :-**

आधुनिक काळातील शासकीय व्यवस्थेत दबावगटाच्या अध्ययनाला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. लोक आपल्या जीवनाच्या गरजा व आवश्यकता पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनावर जास्त प्रमाणात अवलंबून राहिले आहेत. सामजिक हितसंबंधावर आधारीत गटांना महत्त्वाचे स्थान आहे. दबावगट म्हणून कार्य करणाऱ्या संघटना या लोकशाहीच्या अस्तित्वासाठी, विकासासाठी गरजेच्या आहेत. दबावगट म्हणून कार्य करणाऱ्या संघटना या लोकशाहीच्या अस्तित्वासाठी, विकासासाठी गरजेच्या आहेत. महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेली शेतकरी संघटना, शेती क्षेत्रातील लोकांचे प्रश्न हाती घेवून लढत आहे. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची दखल वेळोवेळी शासनासघ्यावी लागली आहे.

**दबावगट :-**

हितसंबंधी गट शासनावर प्रभाव टाकण्यासाठी जेव्हा कृती करतात तेव्हा त्यांना दबावगट असे म्हणतात. कायदेमंडळातीलसदस्यांवर प्रभाव गाजवण्यासाठीहे दबावगट ज्या राजकीय तंत्राचा वापर करतात त्याला लॉबी असे म्हणतात दबावगटाची सामान्य सदस्यांच्या हितसंबंधाचे अविष्करण करणे, गटातील सदस्यांच्या मागण्या स्पष्ट करुन शासनापर्यत पोहोचविणे, आपल्या गटाच्या सदस्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी विशिष्ट दृष्टीकोन, विशिष्टव्यक्ती आणि विशिष्ट कल्पना, विशिष्ट धोरणे यांचा पाठपुरावा करणे, गट सदस्यांच्या अपेक्षा व्यक्त करणे. त्याचप्रमाणे त्यांच्या तक्रारींनाही वाचा फोडणे,प्रत्यक्ष निवडणुकीत भाग घेता आला नाही तरी आपल्या हितसंबंधाचे अविष्करण आणि संरक्षण करणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठिंबा देणे. ही कार्ये आहेत

**भारतातील शेतकरी चळवळ :-**

भारत हा एक शेतीप्रधान देश असून देशातील बहुसंख्य लोक उपजिवीकेसाठी शेतीवर अवलंबूनआहेत. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती हे महत्त्वाचे क्षेत्र असून शेती क्षेत्रात घडणाऱ्या गोष्टींचा, बदलांचा परिणाम एकंदर अर्थव्यवस्थेवर होत असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातही शेतकऱ्यांची अनेक आंदोलने व उठावांची इतिहासात नोंद आहे. शेतकरी आंदोलनाची सुरुवात १६ व्या शतकापासून झाली.स्वातंत्र्योत्तर काळात कामगार पक्ष, किसान सभा, लालनिशाण पक्ष (१९६५) इत्यादी पक्षांनी व शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी आंदोलने उभारली.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या एका वर्षाच्या आतच शेतीमालाच्या प्रश्नांवर आंदोलने उभारली. यात तिभागा शेतकरी चळवळ, तेलंगाना शेतकरी चळवळ (१९४६-५१),थंजावुर शेतकरी चळवळ आहेत.

**महाराष्ट्रातील शेतकरी संघटना :-**

महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांच्या आंदोलनाच्याबाबतीत महात्मा फुले व महर्षी वि. रा. शिंदे यांच्या बरोबरीने महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, न्यायमूर्ती गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, सार्वजनिक सभा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाने शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न केलेले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर जवळजवळ दोन दशके शेतकरी वर्ग संघटनात्मक पातळीवर एकत्र आलेला दिसत नाही. मात्र १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात मात्र शेतकरी वर्गामध्ये राज्यकर्त्या वर्गाच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात शेतकरी वर्गाने राज्यसंस्थेबद्दलचे मतभेद नोंदविण्यास सुरूवात केली. शेतकरी वर्ग, शेतकरी संघटनेच्या मार्फत हितसंबंधाचे सुसूत्रीकरण करू लागला. शेतकरी संघटनेच्या मदतीने शेतकरी वर्गाने हितसंबंधाचे एकत्रीकरण केले. शेतकरी वर्ग त्यांच्या हितसंबंधाबद्दल मागण्यांचे अविष्करण करू लागला. या सर्व गोष्टीला १९७० च्या दशकातील उत्तरार्धाची पार्श्वभूमी आहे.१९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात काँग्रेस पक्षाचे एकमूखी निमंत्रण कमी झाले होते. काँग्रेस पक्षांतर्गत काँग्रेस व काँग्रेस एस पक्ष असे दोन गट निर्माण झाले होते. महाराष्ट्रामध्ये शेती व शेतकऱ्यांसाठी, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी १९८० पासून शेतकऱ्यांचे संघटन करुन शेतकरी संघटनाअस्तित्वात आल्या. त्यात शरद जोशी (शेतकरी संघटना),एन. डी. पाटील(शेतकरी कामगार पक्ष)कापूस उत्पादक संघं, राजु शेट्टी (स्वाभिमानी शेतकरी संघटना), रघुनाथ दादा पाटील(शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य), किशोर तिवारी

(विदर्भ जनआंदोलन समिती) , भारतीय कम्युनिस्ट पक्ष (किसान सभा) वरील शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी अनेक आंदोलने उभारली. शेतकऱ्यांना अनेक प्रश्नी न्याय मिळवून दिला. आजही महाराष्ट्रातव अनेक घटक राज्यात शेतकरी संघटना शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेवून लढा देत आहे.

**शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आंदोलनेः :-**

- २० नोव्हेंबर १९८० ला कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापसाला ७००/- रूपये हमी भाव मिळावा या मागणीसाठी चक्का जाम आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्त्व शरद जोशी यांनी केले. या आंदोलनात कापूस उत्पादक संघ, शेतकरी संघटना व तत्कालीन विरोधी राजकीय पक्ष तर आंदोलनातील सहभाग लक्षात घेता शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी व विविध राजकीय पक्ष आंदोलनात सामील झाले होत. महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस उत्पादक संघाच्या माध्यमातून कापसाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा म्हणून १५ डिसेंबर ते १८ डिसेंबर १९८१ मध्ये जंगल तोडो सत्याग्रह केला. या सत्याग्रहामध्ये डॉ. कोरपे, ॲड. कराळे, महादेवराव भुईकर व गोविंदराव गुडधे यांच्य सहभाग होता. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी कापसाच्या हमी भावासाठी विविध आंदोलने उभारली, तरीही शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नव्हता.१९७१ साली शासनाने एकाधिकार योजना सुरू केली व शेतकऱ्यांना हमीभाव देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तोही अपूराच राहिला. त्यामुळे शेतकऱ्यांनी १५ जानेवारी १९८५ रोजी ठिय्या आंदोलन उभारले. या आंदोलनाचे नेतृत्त्व शरद जोशी यांनी केले होते.

- १९८५ साली शेतकऱ्यांनी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या वस्त्रोद्योग धोरणाविरूद्ध राजीव वस्त्र रोको सत्याग्रह केला. या सत्याग्रहामध्ये शेतकऱ्यांनी ज्या लोकांनी कृत्रिम धाग्याचे वस्त्र वापरलेले आहे, त्यांना प्रवासात अडविणे, त्यावर शेतकरी संघटनेचा शिक्का मारणे, त्यांना गावबंदी करण्यासारखे कार्यक्रम राबविले. त्यामुळे या सत्याग्रहास जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग असल्याचे दिसले. २ ऑक्टोबर १९८६ रोजी कापूस किसान संमेलन आयोजित केले.

- शेतकरी संघटनेने २ जानेवारी ते २७ जानेवारी १९९० रोजी तडगुण, सातारा ते नागपूर येथे विचार यात्रा काढली. महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी शताब्दी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही विचार यात्रा काढण्यात आली. त्यांस शेतकऱ्यांनी 'फुले-आंबेडकर विचार यात्रा' असे संबोधले. तर या यात्रेचा समारोप नागपूर येथे झाला. शेतकरी संघटनेने नवीन मुक्त आर्थिक धोरणाचा फायदा शासकीय धोरणामुळे शेतकऱ्यांना मिळेनासा झाल्याने ८ फेब्रुवारी १९९२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन केले. रास्ता रोको आंदोलनाचा निर्णय शेतकरी संघटनेने जळगांव येथे २५ जानेवारी १९९२ रोजी घेतला होता.

- शेतकरी संघटनेने विदर्भ बळीराज्य मेळावा २५ एप्रिल २००० साली वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर येथे आयोजित केला होता. या बळीराज्य मेळाव्यास जवळ जवळ पाच लाख शेतकऱ्यांचा सहभाग होता. नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे २००१ साली शेतकरी संघटनेने धान (भात) उत्पादक परिषद घेतली होती. शेतकरी संघटनेने ९, १० व ११ नोव्हेंबर २००३ रोजी चंद्रपूर येथे ९ वे अधिवेशन घेतले होते.

- अहमदनगर जिल्ह्यामध्ये ऑक्टोबर १९८० रोजी शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम शेतकरी आंदोलन उभारले. हे शेतकरी आंदोलन ऊसाच्या भावासाठी उभारण्यात आले. 'महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी ऊसास प्रति टन ३०० रूपये भाव द्यावा' ही प्रमुख मागणी शेतकऱ्यांनी या आंदोलनामध्ये केली.

- पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी २२ जून १९८२ रोजी नाशिक, पुणे, सातारा, सांगली, धुळे, जळगांव व औरंगाबाद येथे दुध आंदोलन उभारले. २ ऑक्टोबर १९८८ रोजी शेतकऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून कोल्हापूर येथे 'कर्जमुक्ती आंदोलन' केले.

- पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांनी विविध शेती प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी ५ जून २००६ रोजी मोर्चा काढला. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसास किमान वैधानिककिंमतीनुसार भाव मिळविण्यासाठी 'निर्धार यात्रा' काढली.

- ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथे ७ ऑक्टोबर २००६ रोजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'ऊस परिषद' घेतली

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दुधाच्या दरवाढीसाठी १६ ऑक्टोबर २००६ रोजी भोगावती, जि. कोल्हापूर येथे दुध परिषद घेतली.

पश्चिम महाराष्ट्रातील प्रामुख्याने कोल्हापूर व सांगली जिल्ह्यामध्ये १२ डिसेंबर २००७ रोजी शेतकऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून 'खर्डा-भाकर' आंदोलन उभारले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. तर दूसरीकडे बँका, साखर कारखाने शेतकऱ्यांना लूटत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर खर्डा-भाकर खाण्याची वेळ आली आहे, असे सांगून शेतकऱ्यांनी कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'खर्डा-भाकर' आंदोलन उभारले भोगावती येथे झालेल्या दुध परिषदेतून प्रेरणा घेवून हातकणंगले तालूक्यातील शेतकऱ्यांनी २४ ऑक्टोबर २००६ रोजी एक दिवसाचे 'दूध बंद आंदोलन' केले.

अशाप्रकारचे विविध कृती कार्यक्रम शेतकऱ्यांनी हाती घेतले आणि त्याद्वारे न्यायालयातून लढा देण्याचे ठरविले. या आंदोलनापाठीमागील मुख्य कारण म्हणजे कर्जमाफीने शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा जाणार नाही हे होते. तर दुसऱ्या बाजूने शासन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला वर्षानुवर्षे उत्पादन खर्चावर आधारित भाव देत नसल्याने शेती व शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढत गेला आहे. म्हणून शेतकऱ्यांकडे असलेली कर्जे ही अनैतिक आहेत. त्यामुळे उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्याशिवाय शेतकरी कर्जमुक्त होणार नाहीत असे दिसते. शिवाय शेतकऱ्यांनी बांधावरचे आंदोलन रस्त्यावर व रस्त्यावरचे आंदोलन न्यायालयात आणले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतकरी संघटनेने संघटनेची संघटनात्मक बांधणी केली. संघटनेच्या शाखा उघडल्या गेल्या. जात, धर्म, प्रदेश असा भेदाभेद न करता शेतकरी व शेतीप्रश्नांना महत्व देवून ते सोडविण्याकरीता शेतकऱ्यांना एकत्रीत केले आणि आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी संघटनेच्या विचारांशी शेतकरी जोडला गेला. शेतकरी संघटनेच्या सामाजिक व आर्थिक विचारांबरोबरचराजकीय विचारांशी तो जोडला गेला. परिणामी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा राजकीय सहभाग वाढला. स्वतंत्र भारत पक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एक राजकीय व्यासपीठ उपलब्ध झाले

शेतकरी संघटनेच्या माध्यमातून नवनेतृत्व उदयास येवून त्यांच्या नेतृत्व विकासाला चालना मिळाली. अनेक नेत्यांना आपले नेतृत्व व कर्तुत्व सिद्ध करता आले. शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या माध्यमातून १९८०-८१ पासून शरद जोशी, २०००-२००१ पासून राजु शेट्टी आणि २००४-०५ पासुन रघुनाथदादा पाटील तसेच राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, पाशा पटेल, ॲड. वामनराव चटप, संजय कोल्हे इत्यादींच्या स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत अनेक नेत्यांना आपले नेतृत्व सिद्ध करता आले. शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे व्यापारी, सरकार, राजकीय पक्ष व अन्य दबावगटांवरही पडला.

**सारांश :-**

स्वातंत्र्योत्तर काळात विविध पक्षातील अनेक नेत्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवला आंदोलने केली परंतु ती पक्षीय परिक्षेत्रातच राहीली त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकले नाहीत. १९७८ साली स्थापन झालेल्या शेतकरी संघटनेने वर्गीय संघर्ष नाकारुन शेती व शेतकऱ्यांमध्ये वर्ग समन्वय निर्माण करणारी भूमिका घेतली त्यामुळे सर्व वर्गाचे समुचीत प्रतिनिधीत्व करणारी संघटना म्हणून ती नावारूपाला आली. शेतकरी संघटनेची कार्यपद्धती मुख्यत: शासनावर दबाव आणण्याचीआहे. दबावाचे तंत्र वापरुन उत्पादन खर्चावर आधारीत किफायतशीर भाव मिळवीणे ही आहे. विविध राजकीय पक्ष व शेतकरी संघटना आंदोलने उभारीत असतांना राज्यकर्त्या वर्गाचे सामाजिक चारित्र्य देखील शेतकरी वर्गाचे दिसून येते. यामुळे शेतकरी आंदोलने आणि राज्यकर्तावर्ग यांच्यामध्ये परस्परविरोध दिसून येतो.

**संदर्भसूची**

१. भोळे भास्कर, भारतीय शेतकरी कामगार पक्ष जडण घडण आणि वाटचाल, १९४८-१९६० लोकवाङमय गृह.
२. जोशी शरद, शेतकरी संघटना, राजकीय भूमिक, शेतकरी प्रकाशन नागपूर, १९९४, पृ.क्र.२
३. जोशी शरद, शेतकरी संघटना, विचार आणि कार्यपद्धती, जनशक्ती बुक्स ॲण्ड पब्लिकेशन्स, औरंगाबाद,
४. नरदे अजीत, शेतकरी संघटना, राजकीय भूमिका, शेतकरी प्रकाशन, नागपूर, १९९४